गीतगंगा

द.वि. गुप्ते



ध्वनिमुद्रित भक्तिगीते, भावगीते, पदे इ.

प्रकाशक :
अरविंद दत्तात्रेय गुप्ते
गोविंदराम हौसिंग सोसायटी,
आझाद रोड, अंधेरी (पश्चिम).

मुखपृष्ठ चित्र :
श्री. अरुण ठाकूर, ठाणे.

ब्लॉक मेकर्स :
नवनीत प्रोसेस, घंटाळी, ठाणे २.

प्रथमावृत्ती :
१९-१०-१९८६

मुद्रक :
कृ. भि. राऊळ
सत्यसेवा मुद्रणालय, अलिबाग

मूल्य : १० रुपये

गीतगंगा

[आपल्या असंख्य लोकप्रिय गीतलेखनाने ज्यांनी जवळ जवळ वीस वर्षे उभा महाराष्ट्र गाजविला, त्या कै. द. वि. गुप्ते यांचे चरणी त्यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त ही गीत सुमनांजली सादर अर्पण]

– अरविंद द. गुप्ते

या संग्रहातील गीते आकाशवाणी, H. M. V., कोलंबिया, ट्वीन, इत्यादि कंपन्यांनी ध्वनिमुद्रित केलेली आहेत. त्या गीतांचे सं. दिग्दर्शक व गायक कलावंत यांची ही श्रेयनामावली.

संगीत दिग्दर्शक

श्री. जी. एन. जोशी,

श्री. ए. पी. नारायणगांवकर, श्री. व्हो. जी. भाटकर.

गायक

श्री. ए. पी. नारायणगांवकर, सौ. कालिंदी केसकर, सौ. लीला सरदेसाई, कु. विजया देसाई, सौ. स्नेहलता मराठे, सरोजिनी वझे, सौ. शांता जोशी, कु. विमल परकी, सौ. इंदुमती चौबळ, कु. विमल गुप्ते, कु. सुधा जयवंत, कु. नंदा भोसले, कु. यमुना गोडबोले, कु. सरोजिनी रेगे, प्रभावती केसकर, कु. कृष्णा उधावरकर, सरोज बोरकर, कु. सुमती त्रिलोकेकर, ताराबाई गदगकर, श्री. दत्ता केळकर, श्री. के. एच्. वाकणकर, मास्टर चंदावरकर, मास्टर तुलसीराम इत्यादी.

□ □ □

प्रस्तावना

१९३२ पासून भावगीतांचा जमाना सुरु झाला व मराठी ध्वनिमुद्रिकांचे एक नवीन आकर्षक पर्व सुरु झाले.

मी हिज मास्टर्स व्हॉईस कंपनीत १९३८ मध्ये अधिकृत-रित्या प्रवेश केला व त्यानंतरची जवळ जवळ ३०–३२ वर्षे नवनवीन कलाकार, भावगीत, सुगम संगीत, शास्त्रीय संगीत, वाद्यसंगीत, या संगीताच्या विविध प्रकारांत आपल्या अंगच्या कलागुणांमुळे पुढे आलेले वा येण्याची धडपड करीत असलेले अनेकजण नजरेस व ऐकण्यात आले. त्यापैकी जे जे ध्वनिमुद्रिकांच्या दृष्टीने माझ्या (म्हणजे चांगला आवाज, संगीताचा अभ्यास, वैशिष्टयपूर्ण गायन–वादनाची शैली व तयारी या दृष्टीने) व कंपनीच्या व्यापाराच्या दृष्टीने योग्य, अशा कलाकारांची निवड करण्याकडे माझी शोधक दृष्टी नेहमीच असे. प्रत्यक्ष ध्वनिमुद्रणां-साठी या उदयोन्मुख कलाकारांप्रमाणेच नवनवे प्रतिभासंपन्न कवी व संगीत नियोजक यांचीही गरज वाढीस लागली. त्यांतून काव्यरचने-साठी जे काही मला आठवले व ज्यांचे फार बहुमोल साहाय्य मला झाले, त्यामध्ये कै. द. वि. गुप्ते यांचे नाव घ्यावेच लागेल. कै. माडगुळकर, कै. स. अ. शुक्ल हे कवी तर होतेच पण त्यांच्या अन्य व्यवसायामुळे ते हमखास मिळतीलच अशी खात्री नसे. अशा वेळी मला कै. द. वि. गुप्ते यांची फारच मदत झाली. कै. गुप्ते हे मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत एका जबाबदारीच्या खात्यांत (Legal Dept.) काम करीत व केवळ हौसेखातर काव्य करण्याची त्यांना फार फार आवड. सात्विक, साधा, निरपेक्ष व

विनम्र स्वभावामुळे त्यांच्या लिखाणांतही या स्वभावगुणांचे दर्शन झाल्यास नवल नाही. साधारण १९४० ते १९४७–४८ पर्यंतच्या काळांत मजकडे ध्वनिमुद्रणासाठी आलेल्या अनेक होतकरू कलाकारांसाठी द. वि. नी मला फारच बहुमोल मदत उत्तमोत्तम काव्यरचना देऊन केली. या अशा कलाकारांत एकेकाळी विशेष पुढे आलेले व गाजलेले काही कलाकार मला आठवतात. त्यामध्ये श्रीमती इंदुमती चौबळ, सौ. लीला सरदेसाई, सौ. कालिंदी केसकर, श्रीमती यमुना गोडबोले, कु. सुमती त्रिलोकेकर, श्रीयुत दत्ता केळकर, श्रीयुत के. एच. वाकणकर, श्रीमती सरोज बोरकर, श्रीमती स्नेहलता मराठे, यांचा उल्लेख करावा लागेल. या सर्व गायक कलाकारांना कै. गुप्ते यांच्या रचना अतिशय आवडत व आमचे त्या काळांतील संगीत नियोजक श्री. व्ही. जी. भाटकर, संगीतरत्न ए. पी. नारायणगांवकर यांनीही त्या रचनांवर उत्कृष्ट स्वरसाज चढवला व या नवोदित कलाकारांना ध्वनिमुद्रिकांच्या क्षेत्रांत उत्तम यश मिळवून दिले. यांत त्या यशांतील फारच मोठा वाटा कै. श्री. गुप्ते यांचेकडे जातो. ते आमचे एकेकाळचे सहकारी व मित्र आज जरी आपल्यांतून कायमचे गेले असले तरी त्यांची स्मृती, त्यांनी लिहिलेल्या काव्यरुपाने संग्रहित करून त्यांचे चिरंजीव श्री. अरविंद गुप्ते रसिकांना उपलब्ध करून देत आहेत. ती रसिकमान्य ठरेल असा पूर्ण विश्वास व खात्री मला आहे.

– जी. एन. जोशी
(माजी एच. एम. व्ही. ध्वनिमुद्रण प्रमुख)

कविवर्यांना आदरांजली

* माझे परम स्नेही कै. द. वि. गुप्ते यांचा गेय काव्यसंग्रह त्यांच्या हयातीतच प्रसिद्ध होणं आवश्यक होते पण ते गेल्यानंतर दोन वर्षांनी– त्यांच्या श्राद्धदिनी– हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे, हेही नसे थोडके !

* एकेकाळी कविवर्य द. वि. गुप्ते यांची ही गीतं जशी ग्रामोफोन रेकॉर्ड रूपानं प्रसिद्ध झाली, लोकप्रिय झाली तशीच ती आकाशवाणीवरूनही अनेक नामवंत गायक-गायिकांनी आवर्जून गायिली. त्यामुळे त्याकाळी द. वि. गुप्ते एक 'प्रथितयश कवी' म्हणून गणले गेले, ते गीतांतील 'प्रसादगुणामुळेच ! शब्दार्थांचा खून करणारी अशुद्ध ओढाताण आजच्या मान्यताप्राप्त कवींमध्ये दिसते तशी गुप्ते यांच्या गीतांमध्ये व अन्य कवितांमध्येही कुठे आढळली नाही. कारण गेय वृत्तांची जाण व मराठीचे सम्यक् ज्ञान त्यांच्यापाशी होतं.

* आकाशवाणीवर गायिल्या जाणाऱ्या गीतांबद्दल आज कवींना रास्त मोबदला मिळतो. कुणाही सामान्य कवित्व असलेल्या कवींना सुद्धा 'आकाशवाणी–मान्यताप्राप्त कवी' ही बिरुदावली प्राप्त होऊ शकते पण त्या काळी कुणाही गायक–गायिकेला विनामूल्य लेखी परवानगी देऊन आकाशवाणीला सदैव सहकार्य देणाऱ्या द. वि. गुप्तेंसारख्या

लोकप्रिय कवीला मात्र मान्यता देण्याचं आकाशवाणीनं झिडकारलं, ही एक आश्चर्यजनक घटना आहे.

* यामागील रहस्य काय आहे, ते सूज्ञास सांगणे नलगे ! हा गीतसंग्रह प्रसिद्ध झाल्यानंतर तरी आकाशवाणीला द. वि. गुप्ते यांचे महत्व पटेल काय ? देव जाणे !

* शेकडोंनी ध्वनिमुद्रित झालेली द. वि. गुप्ते यांची ही लोकप्रिय गीते, श्रुतिका, नाटिका इ. चा रेकॉर्डस्–संग्रह आज अस्तित्वात नाही, ही एक शोकांतिका आहे.

* कविवर्य द. वि. गुप्ते यांच्या अनेक उत्कृष्ट कविता, मासिकांतून व साप्ताहिकांतून सतत प्रसिद्ध होत असत. त्यांचाही ‘ काव्यसंग्रह ’ लवकर प्रसिद्ध व्हावा व त्यांच्या श्रेष्ठ ‘ काव्यगुणांचा परिचय आजच्या रसिकांना लवकर व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करून माझी ही ‘ आदरांजली ’ पूर्ण करतो.

– प. पी. नारायणगांवकर
९–९–१९८६

मनोगत

माझे वडील कै. द. वि. गुप्ते यांनी अनेक कविता, विनोदी गोष्टी लिहिल्या. दीडशेच्या वरती ग्रामोफोन रेकॉर्डस्‌साठी गीते लिहिली. पण हे सर्व १९३० ते १९५० या काळात. त्यानंतर ऑफिसच्या कामामुळे त्यात खंड पडला, पुढे पुढे तर फक्त दिवाळी अंकातूनच त्यांचे थोडेफार लेखन होऊ लागले. त्यांचे एकूण तीन विनोदी कथासंग्रह प्रसिद्ध झाले, तेही १९३८ ते १९४४ च्या दरम्यान. परंतु त्यांची जी अनेक गीते ध्वनिमुद्रित झाली ती सर्व गाणी पुस्तकरूपाने प्रकाशित करावीत असं त्यांच्या मनातही आले नाही व त्यावेळी आम्हालाही ते सुचलं नाही.

परंतु त्यांचे परममित्र, सुप्रसिद्ध संगीतरत्न व संगीत दिग्दर्शक श्री. ए. पी. नारायणगांवकर यांच्याच आग्रहामुळे आज हे पुस्तक प्रकाशित होऊ शकले आहे. खरं म्हणजे १९८३ झाली त्यांनीच वडिलांजवळ या बाबतीत आग्रह धरला होता. ते वडिलांना म्हणाले ' द. वि. तुमची इतकी चांगली गाणी आहेत, त्यांना चालीही उत्तम दिलेल्या आहेत, आजही ती गाणी कुणाही गायक व गायिकेला गायला नक्कीच आवडतील तर, त्यांचा तुम्ही पुस्तकरूपाने संग्रह का काढीत नाही ?' त्यादृष्टीने हालचालही सुरु झाली. पण माझ्या कामाच्या व्यापामुळे मी त्यात म्हणावे तितके लक्ष घालू शकलो नाही. पण दुर्दैव आमचे की आमचे वडिल अचानकपणे आम्हाला सोडून गेले. आमच्या आनंदावर विरजण पडले. पण श्री. ए. पी. नारायणगांवकर यांनी आम्हाला पुन्हा प्रवृत्त केले. ते म्हणाले ' आता तर हे पुस्तक निघायलाच हवे. या मित्राच्या प्रेमामुळेच हे पुस्तक आज प्रकाशित होत आहे.

श्री. ए. पी. नारायणगांवकरांच्या बहुमोल साहाय्याशिवाय आम्ही ही प्रगती करू शकलो नसतो.'

पुस्तक छपाईची सर्व जबाबदारी माझे आतेभाऊ श्री. वि. का. शृंगारपुरे व त्यांचे मित्र सुप्रसिद्ध कवि श्री. म. पां. भावे यांनी आपलेपणाने स्वीकारल्यामुळेच हे पुस्तक 'द. वि.' च्या प्रथम स्मृतीदिनी प्रकाशित करण्याचा सुयोग साधणे शक्य झाले आहे. त्यांचा मी मनापासून आभारी आहे.

H. M. V. चे माजी ध्वनीमुद्रण प्रमुख व ख्यातनाम गायक श्री. जी. एन. जोशी यांनी आपलेपणाने या पुस्तकास सुयोग्य अशी प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल मी त्यांचाही फार फार आभारी आहे.

ज्यांनी वडिलांच्या अनेक गीतांना सुमधुर व भावपूर्ण अशा चाली दिल्या त्या संगीत दिग्दर्शक श्री. ए. पी. नारायणगांवकरांनी वाहिलेली आदरांजली, तर अतिशय हृद्य अशीच आहे. त्यांच्या आजपर्यंच्या सर्व सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार कुठल्या शब्दांत मानू ?

सत्यसेवा मुद्रणालयाचे चालक श्री. राऊळ व त्यांचा कामगार वर्ग यांनी अत्यल्प वेळात पुस्तक सुबक स्वरुपात छापून दिल्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो. चित्रकार श्री. अरुण ठाकूर यांनी मुखपृष्ठासाठी आकर्षक चित्र काढून दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

शेवटी आजच्या मराठीतील उदयोन्मुख व नामवंत गायक गायिकांना ही जुनी पण आकर्षक चालीत स्वरबद्ध झालेली गीते आवडतील व त्यांच्या सुमधुर आवाजात ती पुनरपि जनमानसापर्यंत पोचतील, एवढीच अपेक्षा व्यक्त करून हे माझे मनोगत मी पूर्ण करीत आहे.

— अरविंद द. गुप्ते

अनुक्रमणिका

भजने

भावगीते

भजनें

भजने

भजने

दर्यागीते

लावणी

अंगाई गीते

बालगीते

पदे

प्रभुनाम सतत तू

प्रभुनाम सतत तूं गाई नरा ।
प्रभु नेईल तुजसी भवपार खरा ! ॥ धृ० ॥

हीनदीन जो नच माजी लव
तारक प्रभु सकलांचा रे हा
गान तयाचे गाई निरंतर ॥ १ ॥

भाव भक्तिने वश हा तर
मंगलमय प्रभु माझा रे हा
तारि तुला तो, देई न अंतर ॥ २ ॥

प. पी. नारायणगांवकर
गायक व संगीत

का भुलला रे

का भुलला रे क्षण संसारा
मृगजळसम हा सकल पसारा ।। धृ० ।।
कोण कुणाचा सगा सोयरा
परकी तुज जर धन सुत दारा
दाविल प्रभुजी मार्ग खरा ।। १ ।।

लटकी माया लटकी काया
क्षणभंगुर रे जाईल वाया ।
एक प्रभू तुज अंति निवारा ।। २ ।।

ए. पी. नारायणगांवकर
गायक व संगीत नियोजक

भज भज रे

भज भज रे प्रभु राम। निरंतर।
भज भज रे प्रभु राम ॥

गुंतु नको तू माया जाळी ।
आळव घे प्रभु नाम ॥ धृ० ॥

परनारी, तू मान विषासम ।
चुकता तुज प्रभु करील शासन ।
न पडे त्याला दाम ॥ १ ॥

थोर विचारी मानव तू तर ।
जाशिल तरुनी हा भवसागर ।
मुखी घेता हरिनाम ॥ २ ॥

होऊ नको तू स्वार्थ-परायण ।
भज भज रे नित हरि नारायण ।
करि सेवा निष्काम ॥ ३ ॥

प. पी. नारायणगांवकर
गायक व संगीत नियोजक

धाव पाव

धांव पाव सखया, सदया ।
पंढरिच्या राया, माझ्या
पंढरिच्या राया ।। धृ० ।।

पायीं रुततात कांटे
जातां पंढरिच्या वाटे
झणिं येई कर द्याया
पंढरिच्या राया । माझ्या ।। १ ।।

निशिदिनी तुझा छंद
जीवा आनंदी आनंद
मन आतुर भेटाया
पंढरिच्या राया । माझ्या ।। २ ।।

आळवून आळवून
व्याकळून गेले प्राण
नको अंत पाहूं वाया
पंढरिच्या राया । माझ्या ।। ३ ।।

विमल पत्की
गायिका

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

प्रभु मम मंदिरी

प्रभु मम मंदिरि या हो
या हो, या हो, दर्शन द्या हो
या हो या हो ॥ धृ० ॥

भक्तीची मज लागे गोडी
पुरवा प्रभुजी इतुकि आवडी
नाम सदा मुखी राहो
या हो याहो ॥ १ ॥

दीन दयाघन म्हणति आपणा
कां मग येना माझी करुणा
ऐकुनि इतका टाहो ।
या हो या हो ॥ २ ॥

ए. पी. नारायणगांवकर
गायक व संगीत नियोजक

तुलसी वृंदावना

तुलसी वृंदावना
घालिते प्रदक्षिणा अंगना ॥ धृ० ॥

ज्योत भक्तिची हृदयी तेवते
धूप दीप नैवेद्य दाविते
उजळुनी नीरांजना ॥ १ ॥

भावाचा प्रभु सदा भुकेला
उभाच द्याया साद हांकेला
पुरवी मनकामना ॥ २ ॥

लाख ज्योतिच्या निरांजनानी
केली कोणी किती आळवणी
भावावाचुनी व्यर्थ साधना ॥ ३ ॥

निर्मल भाव नि निर्मळ अंतर
अशास लाभे ईश निरंतर
भुलेना रत्नदीप कांचना ॥ ४ ॥

□ □ □

गाऊ तव गुणगान

गाऊं तव गुणगान, प्रभुजी
प्रेमळ सौख्य निधान ।
झूटी काया झूटी माया
झूटा अन् अभिमान ।। धृ० ।।

अनंत दुस्तर हा भवसागर
राग लोभ मत्सर हे जलचर
बसले मांडुनि ठाण । प्रभुजी ।। १ ।।

गोड नाम तव पडू दे कानी ।
मुखी येउं दे तुझीच गाणी ।
दे इतके वरदान । प्रभुजी ।। २ ।।

धरूनी कर मम प्रभु घननीळा
नेशिल काय रे पैलतिराला ।
अधिर झाले प्राण । प्रभुजी ।। ३ ।।

□ □ □

मनमोहन मुरलीवाला

मनमोहन मुरलीवाला
रमवायाला सखी हा आला... ॥ धृ० ॥

निशिदिनी ज्याचे ध्यान मनि वसे
आळवुनी गुण मुनी गाती तसे
ध्यानी मनी प्रभू मज दर्शन दे
शोभे मुकुट, गळा वनमाला... ॥ १ ॥

□ □ □

उरला कुठे न थारा

उरला कुठे न थारा ।
दीनास दे निवारा... ॥ धृ० ॥

संसारी या चुकून
गेलो प्रभू रमून
होई न पाठमोरा... ॥ १ ॥

अंधारल्या जगांत
दृष्टीस एक येत
तुझा प्रकाश तारा... ॥ २ ॥

मास्टर तुलसीराम
गायक

स्मरण तुझे यदुराया

स्मरण तुझे यदुराया
प्रेमळ मङ्गल छाया ॥ धृ० ॥

तुजविण आता कोण अनंता
जगन्नियंता तूंच पिता
जीवन तुजविण वाया ! ॥ १ ॥

देउं नको मज पळभर अंतर
चुकल्या मुकल्या जीवा सावर
ये ये प्रभु भेटाया ! ॥ २ ॥

सांगा कुठे प्रभु तुजला पाहू
हीन दीन तुज काय मी पाहू
झिजविन तव पदी काया ! ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

ऊठ प्रभात झाली

ऊठ प्रभात झाली वनमाळी
अजून नीज का पुरी न झाली ॥ धृ० ॥

गाईगुरे कुरणांत निघाली
सनई मंदिरी नादू लागली
आळविती विहंग ही भूपाळी ॥ १ ॥

लेवून वसने लाल भर्जरी
नटली थटली प्राचि सुंदरी
साजरी करी जणू दिपवाली ॥ २ ॥

विजया देसाई
गायिका

ए. पी. नारायणगांवकर
संगीत

तुझ्या मंदिरी

तुझ्या मंदिरी उभा तुजपुढे
दोन्ही कर जोडूनी
काय मागणे मागू देवा
तू विश्वाचा धनी ॥ धृ० ॥

कधी न केली ध्यान धारणा
पदकमले वंदिली
अखंड मजवरी तरी ठेविली
कृपा छत्र सावली ॥ १ ॥

तुझ्या कृपेने या संसारी
कधी न पडले उणे
तुझ्या दर्शने विसरून जातो
मी माझे मागणे ॥ २ ॥

अनंत हस्ते तू देतांना
मावेना दो करी
पुरे दान तव देवा, ठेवा
वरद हस्त मम शिरी ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

तू जिवाचा जादुगार

तू जिवाचा जादुगार, जादुगार जादुगार
दान तुझ्या प्रीतीचे दे होऊनिया रे उदार ! .. ॥ धृ० ॥

चांदण्याच्या रम्य रात्री
घालुनिया हात हाती
रंगविली स्वप्नसृष्टी, तीच ये चितार ! ... ॥ १ ॥

आणि खाडीच्या किनारी
तू नि मी जी रागदारी
गायिली ती जीवनाची, छेडू ये फिरून सतार... ॥ २ ॥

डाव होता आता पुरा
जीव हो का बावरा
जिंकिल्या जीवासवे का खेळशी पुन्हा जुगार... ॥ ३ ॥

□ □ □

वन दरवळले

वन दरवळले सुगंधाने
वसंतराणा वनात आला... ॥ धृ० ॥

मोहरा ये आंबराई
कोकिळा ही गोड गाई
लता तरुंना चढे तजेला...॥ १ ॥

फुलली ही रातराणी
गुणगुणती भृंग रानी
दिला उजाळा चराचराला .. ॥ २ ॥

असल्या या चांदराती
फुलवी जो प्रीत ज्योती
वसंत प्यारा जगास झाला... ॥ ३ ॥

□ □ □

भोळ्या जिवा का

भोळ्या जिवा का बघसी
चंद्रबिम्ब कवळाया ।
हरीण बालके जैशी
फसवे मृगजल प्याया ।। धृ० ।।

अमृत म्हणुनी अधरी धरिला
फसवा का हा जहरी पेला
थांब जरा थांब जरा
लाखाचा जिव जाईल वाया ।

(पद–नाटक : " जमीन अस्मान ")

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

यमुना जळि मुळि

यमुना जळि मुळि ठरे न पाउल
जाइ तोल हरि सांवरी । ये रे ! ... ॥ धृ० ॥

गेला घट मम खोल तळाला
नाही निकट कुणि संकटकाला
होइ राधिका बावरि ! ये रे ! ॥ १ ॥

दे फेकून ती लाडिक वेणू
राहू दे तव वनात धेनु
धाव मोहना लौकरि ! ये रे ! ... ॥ २ ॥

नंदा भोसले
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

नको दूर जाऊ

नको दूर जाऊ, नको ओढ लावू
नको लावू जीवा सख्या कांचनी... ॥ धृ० ॥

मी दीन बाला, तुझ्या दर्शनाला
मोहून आले, इथे धावूनी... १

सख्या प्रीत माझी, न भोळी खुळी
ना रीत राया, जगावेगळी... २

नको अंत पाहू, नको खंत दावू
नको दूर लोटूस, हेटाळुनी... ३

कशी आग लावून माझ्या उरी
तुझ्या सौख्य लाभेल रे अंतरी... ४

नको वेळ लावू, नको खेळ पाहू
मला कोण आता तुझ्यावाचूनी... ५

प. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

तू मनराणी

तू मनराणी लावूनी झुरणी
का छळशी वद दिनरजनी ।... ॥ धृ० ॥

दावू कुणा हृदयव्रणा
सांहू कशा मी यातना
विरले होते स्वप्न एकदा
का उमटावे पुनः पुन्हा ।... १

झाली जरी मन वंचना
गेल्या वठोनी भावना
येउनि फिरूनी सखे साजणी
फुलव प्रीतिचा बाग सुना ।... २

□ □ □

आठवते का पुनवेची

आठवते का पुनवेची ती पहाट तुज साजणी
तू नि मी दोघेच देखिली शुक्राची चांदणी ।।
वहात होते पहाट वारे
काटा अंगी तुझ्या थरारे
अभावितपणे बिलगलीस तू मला सखे येऊनी ।। १ ।।

निळ्या चांदण्या नभांत वरती
पूर्ण चंद्रिका शोभत होती
निळ्या तुझ्या नयनांत पाहिली मीहि नवी मोहिनी ।। २ ।।

फुलली होती रातराणी
दिशांत राहि परिमल भरूनी
आणि विकसली तव मुखकलिका अमोल तसल्या क्षणी ।। ३ ।।

□ □ □

प्रेम सुधेचा प्याला

घे करीं प्रेम सुधेचा प्याला
उशिर का लाव ओठाला... ॥ धृ० ॥

नयनात धुंद आनंद
हृदयात सख्या तव छंद
म्हणुनीच पुढे कर झाला... ॥ १ ॥

घारी परि निधी आकाशी
फिरवीत नजर आधाशी
करि प्राशन या निमिषाला
घे सुधेचा प्रेम प्याला... ॥ २ ॥

□ □ □

चल जाऊ सखे

चल जाऊ सखे फिरू ये ग वनीं
उतरली रम्य संध्या रमणी ! ॥ धृ० ॥

चढली लाली प्राचि–कपोलीं
प्रणयसागरा भरती आली
संकोच नको तू आणू मनी ! ... ॥ १ ॥

सुरेख सङ्गम गोड किती ग
दिनरजनीचा समोर हा बघ
ताराहि पाहती लुकलुकुनी ! ... ॥ २ ॥

दूर अशी का ठेवून अंतर
ये सन्निध, दे हाती तव कर
हृदय बिलगू दे हृदय क्षणी ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

येंशी कशाला दारी

येशी कशाला दारी
छेडीत एक तारी ! ॥ धृ० ॥

मुद्रा तुझी करारी
नयनांत तेज दारी
वाणीत गोडी न्यारी ! ... ॥ १ ॥

तव दिव्य रागदारी
भुलवी आबाल नारी
सारीच जादुगीरी ! ... ॥ २ ॥

शीलवंत आम्ही नारी
तू बाल ब्रह्मचारी
तव सावली विखारी ! ... ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

एकदांच बोल सख्या

एकदांच बोल सख्या प्रीत, आपुली
सुकलेली फुलव फिरून प्रीतीची कळी ! ॥ धृ० ॥

ऋतु वसंत येत जात
बहरा ये सुमनजात
तव कलिका मात्र येथ झुरत एकली ! ॥ १ ॥

करि न सख्या प्रेमभंग
उधळु सुखे प्रणयरंग
तुटलेली फिरून जोड गोड साखळी ! ॥ २ ॥

जीव झुरे भेटाया
दवडू नको क्षणवाया
प्रीतीची रीत तुझी खचित आवळी ! ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

वाजले पाऊल दारी

वाजले पाऊल दारी ओळखीचे साजणा
आणि हेलावून गेल्या अंतरीच्या भावना ॥ धृ० ॥

कोण तू अन् कोण मी ते
गूढ ते दोघांस होते
ये कळीनी तोच आता अंतरीच्या या खुणा ॥ १ ॥

दोन डोळ्यांतील भावा
एकमेका बोध व्हावा
मुग्ध कलिका मुग्ध लीला
दावून भुलवी मधुपांना... ॥ २ ॥

□ □ □

हळुच पाऊल टाक

हळूच पाऊल टाक ! राया
हळूच पाऊल टाक
येऊन मागे चोरपावली
हळूच डोळे झांक ! ॥ धृ० ॥

प्रणयदंग बघ भंवती दुनिया
पसर जादुची मजवर किमया
हळूच खाली वाक... ॥ १ ॥

चंद्र रोहिणी प्रणयी रमली
सागर सरिता एक जाहली
अमोल क्षण हा लाख... ॥ २ ॥

शून्य मने मी कुठवर गाऊं
वाट निर्जनी कुठवर पाहू
ये ऐकूनि मम हाक... ॥ ३ ॥

□ □ □

जपून टाक पाऊल साजणी

जपून टाक पाऊल साजणी
घेऊनी घागर ऐन दुपारी
कुठे चालली ग ! ॥ धृ० ॥

साजणी कुठे चालली ग
येत शिकारी बघ माघारी ! चोरपावली ग ! ॥ १ ॥

शिगोशिग तव अमृत ओठी
नजर जगाची तिथे चोरटी
जपून टाक पाऊल साजणी ! ... ॥ २ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

गीत अस्फुट गाइले

गीत अस्फुट गाईले तू
पाहून मजला सुंदरी
गीत कैचे वार केला
चोरटा तो अंतरी ! ॥ धृ० ॥

भाव त्यातून ओळखावा
हाच तुझा गूढ कावा
आडवाटे सावजाला
गांठिती ऐसे शिकारी ! ...॥ १ ॥

चोरट्या मद्दर्शनाला
जीव तव आसावला
ओळखीले अंतरी
बोलून दावू का तरी ! ... ॥ २ ॥

भंगल्या पात्रांतूनी
झिरपले सारेच पाणी
येईल का आता भरोनी
लाख ओंतून घागरी... ॥ ३ ॥

व्ही. जी. भाटकर
संगीत

नटल्या लतिका

नटल्या लतिका पहा
सुमन गंध वितरी दिनरातीं
भुलवित रसिक मना अहा ! ॥ धृ० ॥

सुगंध घमघमला मधुवनीं
भ्रमर निनादे शांत या वनीं
क्षणभरी घुमवित गीत महा ॥ १ ॥

□ □ □

चल ये झणी

चल ये झणी कुंजवना
सख्या कान्हा मोहना !
गिरिधारी नंदलाला
तव जादुगारी लीला ! ॥ धृ० ॥

सदा मोही मनाला
धुंद झाल्या गोपिबाला
छंद लावी बन्सिवाला
यदुनंदन तू करि नंदवदन
आता मधुवना !

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

प्रेम कैचे

प्रेम कैचे ही जिवाची वंचना
अंतरीच्या यातना सांगू कुणा ! ॥ धृ० ॥

चंद्रिका कोठे कुठे मी काजवा
प्रेम ही भोळ्या जिवाची भावना !
सोड जीवा नाद हा आता खुळा
लोभला का पाहूनी तू मृगजळा
लाभेल कैशी स्वर्गीची ही शोभना ! ॥ १ ॥

प. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

सायन्तारी सागराच्या

सायन्तारी सागराच्या तीरी
चाहूल आली तुझी साजणी
होतीस तू मैत्रिणींच्या सवे
जशी शुक्र ताराच ताऱ्यांतूनी
टाकून दृक्क्षेप माझ्याकडे तू
गेलीस मच्चित्त तू चोरूनी !
गेले किती मास संवत्सरे ही
मी बैसतो त्या स्थळी येऊनी
येशील केव्हा तरी तू स्थळी त्या
वाटेकडे नेत्र आसावूनी !
तू कोण अन् कोठूनी येथ आली
आहे तुझा काय कोणी धनी
मनामाजि माझ्या न हा प्रश्न आला
गेलीस जेव्हा मला जिंकुनी !

ए. पी. नारायणगांवकर
संगीत

नकोस येऊं नदी किनारी

नकोस येऊ नदी किनारी
सखया माझ्या मागोनी
असतिल ज्या मजसवे साजणा
हसतिल त्या मज मैतरणी ! ।। धृ० ।।

रोखू नको रे अवखळ डोळे
जोखू नको मम प्रेम आंधळे
सोड वाट मज जाऊ देना
कुठवरी करावी मनधरणी ! ... ।। १ ।।

नकोस बोलू कठोर वाणी
नकोस लावू जिवा टोचणी
धरशिल रुसवा आणि अबोला
ठाऊक मजला वरकरणी ! ... ।। २ ।।

नकोस जाऊ रुसून मोहना
तुझ्याविना मज स्वर्गही सुना
मी तव राधा तू मम कान्हा
जाऊ चल मग कुंजवनी ! ... ।। ३ ।।

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

पूर्ण चंद्रमा नभांत

पूर्ण चंद्रमा नभांत
दूर शुक्र चांदणी
नख शिखांत न्हालेली
शुभ्र धवल यामिनी

दश दिशांत रातराणी
उधळि गंध मोहिनी
सकळ उपवनांत काय
हीच एक स्वामिनी

सुखद धुंद या क्षणांत
जीव जाय रंगुनी
क्षणभर मग भ्रांत पडे
स्वर्ग हाच की अवनी

□ □ □

हा नजराणा

हा नजराणा पहा प्रीतिचा
माझा राजस राणा
हळूच या हं चोरपावली
निजला आहे तान्हा ।। धृ० ।।

नका सख्यांनो छळू लाजवू
हृदय कसे मी उकलून दावू
गोड गुपित मम उमगायाला
माझ्या वंशा या ना... ।। १ ।।

सुचे न एकही गडे उखाणा
पुरे गलबला दचके राणा
झोपेमाजी नकोच पापा
उठेल माझा कान्हा... ।। २ ।।

□ □ □

लावित वेड पुरे

लावित वेड पुरे रसिकाला
वेणु तुझी घननीळा ! रे । धृ० ॥

सोडून चारा पाणी सारे
येती धावत धेनू वासरे
ऐकून तज मुरलीला ! ... ॥ १ ॥

वणवण फिरते वेड्यावाणी
मीहि मोहना तुझ्या मागुनी
अघटित हरि तव लीला ! ... ॥ २ ॥

मास्टर चंदावरकर
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

चल जाऊ लगबग

चल जाऊं लगबग कुंजवनी
करू किती मोहना मनधरणी ॥ धृ० ॥

शोधून बघ मम मानसमंदिर
तव मूर्तीचा येथे वावर
(प्रीत न माझी रे क्षणभंगुर)
अजून कुशंका काय मनी ॥ १ ॥

विनवित राधा श्यामसुंदरा
तुजविण नाही जीवा निवारा
सख्या धरि अधरि स्वर संजिवनी ॥ २ ॥

सौ. विमल मुंडले
गायिका

व्ही. जी. भाटकर
संगीत

प्रीतीच्या दरबारी

प्रीतीच्या दरबारी प्रेमाच्या दरबारी
रुसणी फुगणी फोल अबोला याची गंमत न्यारी ॥ धृ० ॥

मखमल भासे पायाखाली
काटे जरी विषारी
लता कुंज वाटती, लटकती
शिरी जरी समशेरी.. ॥ १ ॥

ही असली जादुगारी
कणि कोंड्याची साधी भाकरी
तिची किती खुमारी
चंद्रमौळी जरी असे कुटारी
प्रासादाहुनि प्यारी... ॥ २ ॥

सारखे कुबेर आणि भिकारी
असो अमीरी किंवा फकिरी
नाही लव दरकारी
रंगरूप वा कुळी यांवरी
ना सौदा बाजारी
दिलाची धनदौलत सारी... ॥ ३ ॥

□ □ □

दे सजणा आधार

दे सजणा आधार
तू तर प्रेमळ थोर उदार ।। धृ० ।।

अवचित येऊनि हृदय मंदिरी
वृष्टि फुलांची केलिस मजवरी ।
ठसली मूर्ती तव साकार ! ... ।। १ ।।

ध्यासामधुनी भास निरंतर
तुझाच राया होय खरोखर
कर मम तू स्वीकार... ! ।। २ ।।

कु. यमुना गोडबोले
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

जा खुशाल उडुनी

जा खुशाल उडुनी वनांत वनपाखरा
रान फळांचा तुजला चारा ।। धृ० ।।

नाना रंगी सुमने फुलली
पवनासंगे पाने डुलली
मोहविती भ्रमरा... ॥ १ ॥

भाट उषेचे उडुनी गगनी
आळविति बघ मंजुळ गाणी
मावळल्या तारा... ॥ २ ॥

मार भरारी स्वैर, अंबरी
नकोस राहू बद्ध पंजरी
हा तुजला मुजरा... ।। ३ ।।

□ □ □

ऋतु वसंत आला

ऋतु वसंत आला आला
आलापित मधु कोकिळा ॥ धृ० ॥

धुंद समीरण
डुलवित वनवन
दावित अवखळ निज लीला... ॥ १ ॥

आम्र तरूवर
झुलले मोहर
धुंद गंध किती दरवळला... ॥ २ ॥

न्हाली अवनी
नव बहरानी
नंदनवन ये भूतला ! ... ॥ ३ ॥

जी. एन. जोशी
संगीत नियोजक

फुलविल्या तू भावना

फुलविल्या तू भावना
का आता मग वंचना ।। धृ० ।।

लतिका कुंजी
घालुनि रुंजी
झाला आतुर मीलना... ॥ १ ।।

उजळिल तारा
का संसारा
देऊन नव संजीवना... ।। २ ।।

आस ही खुळी
मनि पालवली
ये ना ये झणि मनरमणा... ।। ३ ।।

जी. एन. जोशी
संगीत नियोजक

शोधू कुठे

शोधू कुठे ग शाम माझा
लागे जिवा हुरहुर
लाख कुशंका भिववित वाया
उठे मनी काहूर .. ।। धृ० ।।

वणवण फिरले रानोमाळी
कोठे गेला ग वनमाळी
आज जाहला राजा माझा
का लोटुनि मज दूर... ।। १ ।।

दुडूदुडू धांवत ये घननीळा
कालविला मी तुज दहिकाला
अंधारी ही रात्र पसरली
राहू नको रे दूर... ।। २ ।।

व. पी. नारायणगांवकर
गायक व संगीत नियोजक

गगनि चांद आला

गगनि चांद हा आला
नटली सजली अवनी बाला
नेसुनी भर्जरी वसनाला ॥ धृ० ॥

अर्पित वरूनी अमृतधारा
मोद जाहला प्रीत चकोरा
पाहूनी सुधाकराला ॥ १ ॥

का झुरशी तू वृथा साजणी
सांग उघड तव प्रेम कहाणी
प्रियतम तुझ्या जिवाला... ॥ २ ॥

दोन घडीची अमोल वेळा
जाते झडुनी क्षणाक्षणाला
जरी तुज विलंब झाला... ॥ ३ ॥

सुमती धारप
गायिका

प. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

रुसली राधा मोहना

रुसली राधा मोहना या ना शांतवाया
फोल तुझी का मृगजल माया
जाळिसी का जीवा या ॥ धृ० ॥

प्रभुजी या हो या भेटाया
लोपली का हो प्रेमळ छाया
लाविसी का रे जिवा माया ।

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

येउं नको जवळी

येउं नको जवळी वनमाळी ।
जा वनात घुमवित मुरली ।। धृ० ।।

मी गोरी राजस बाळी
तव तनु ही काळी काळी
कशि जुळेल जोडी अपुली ।। १ ।।

प्रिय तुजला मजहून वेणू
जा खुशाल हाकीत धेनू
राधिका तुला ही मुकली ! ।। २ ।।

जी. एन. जोशी
संगीत नियोजक

जाऊ नको सख्या आज

जाऊ नको सख्या आज समिंदरा
जिवाचा भरवसा नाही जरा ! ॥ धृ० ॥

सोसाटचाचं सुटलंय वारं
फिरतंय गरगर जग हे सारं
बरसात पडे ही मुसळधारा ! ... ॥ १ ॥

धडधड आदळत डोंगर लाटा
अंगी थरारे सळसळ काटा
कोण हाकील गलबत समिंदरा ! ... ॥ २ ॥

लखलखते ही बिजली वरती
मेघ भयानक अन् गडगडती
नको जाऊ सख्या, मला सोडून घरा ! ...॥ ३ ॥

सौ विमल मुंडले
गायिका

ए. पी. नारायणगांवकर
संगीत

भेट सख्या झाली

भेट सख्या झाली तुझी रङ्गमहाली
तनुतनूंत बिजली सळसळली रे ! ॥ धृ० ॥

तुला दिला करून मी विडा
तूही झाला सख्या वेडा
बघून भरज्वानिची माझी कळी रे ! ... ॥ १ ॥

जीव माझा रे भोळा खुळा
तुला क्षणांत रे वश झाला
नाही पुसली जात अन् कुळी रे ! ॥ २ ॥

लिंबावाणी काया मुसमुसली
विरहाची आग रसरसली
जिवलगा प्रहररात उलटली रे ! ... ॥ ३ ॥

सरोज बोरकर
गायिका

ए. पी. नारायणगांवकर
संगीत

झुरशि मनीं साजणी का तरी

झुरशीं मनी साजणी का तरी
प्रणयाच्या शृंगारा त्वरित मोहूनी भुलली ग ! ॥ धृ० ॥
दावुन प्रीती
लटकी खोटी
तू परभारा गेलिस दूरी ! का तरी ?
मागाहून का
रोष मग फुका
का अंगार लावूनी जाशी अंतरी !

□ □ □

येणार तू घराला

येणार तू घराला, राया निरोप आला
हृदयांत प्रीत ज्योती
जी मंद मंद होती
झाली प्रकाशपूर्ण संपूर्ण स्वागताला ॥ १ ॥
आधीच चंद्रमौळी
या झोपडीत आली
किरणे प्रभावशाली द्याया नवा उजाला ॥ २ ॥
मृदु गालिचा बसाया
आणू कुठून राया
हृदयांत मांडिलेल्या स्वीकार आसनाला ॥ ३ ॥
नाही घरात सजणा
पक्वान्न गोड नाना
कांदा नि भाकरीचा तू गोड मान काला ॥ ४ ॥
आताच दुग्धधारा
ही काढिली उदारा
तू प्राशिताच माझा हा जीव धन्य झाला ॥ ५ ॥

सौ. इंदुमती चौबळ
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

पसरे चोहिकडे

पसरे चोहिकडे अंधार
तुज साजणा पैलतिराने । तुजवर मम आधार । धृ० ।।

मेघानी हे गगन व्यापिले
तारांगण ही लुप्त जाहले
क्षणभर पथ जरी दावित बिजली । दूर किनारा फार ।। १ ।।

ठेवू कुठे मी सखया पाऊल
प्राण जाहले अधीच व्याकुळ
इथवर चालून गात्रे शिणली झुरे तनु सुकुमार ।। २ ।।

ये सखया ये सावरि काया
जीव अधीर हा तुज भेटाया
कुठवर राहू उभी एकली । ने मज सागर पार ।। ३ ।।

सौ. लीला सरदेसाई
गायिका

ए. पी. नारायणगांवकर
संगीत

चल चल सजणे

चल चल सजणे गुंजत गाणे ।
मळ्यात आपण जाऊ ग ।

फुले चहुकडे धवल चांदणे ।
साज रजनिचा पाहू ग... ॥ धृ० ॥

रात राणीच्या धुंद परिमले
हरित रान दरवळले सगळे

मिटल्या नयनी बघे कमलिनी
प्रीत रंग तिज दावू ग... ॥ १ ॥

पाय सोडूनी तळ्यांत आपण
एकमेक कर गळ्यात घालून

बहर प्रीतिच्या एकांती
प्रणय रंगी चल न्हाऊ ग... ॥ २ ॥

प्रभावती केसकर
गायिका

ए. पी. नारायणगांवकर
संगीत

तू हांस गडे

तू हांस गडे नाच गडे
हांस गोड फुलराणी
मी गाइन तुझीच गाणी ॥ धृ० ॥

कुहू कुहू कुहू कुहू कोकिळ गाई
झुळ झुळ मंजुळ ओहळ वाही
बहरे बाग फुलांनी... ॥ १ ॥

फुलले अनंत तारे अम्बरी
डुले झुले ही नाव किनारी
मंद समीरण रानी... ॥ २ ॥

गोड अशा या मंगल काली
नटली निशा बघ भवताली
तू का गे मग उदासवाणी ? ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
गायक व संगीत नियोजक

भंगली ना हृदयवीणा

भंगली ना हृदयवीणा
अंत तू का पाहिला
जीव होता मी जरी रे
पायिं तव हा वाहिला ।। धृ० ।।

पाखराची गोड गाणी
निर्झराची आणि वाणी
ऐकुनिया रोज रानी
विरह तुझा साहिला ।। १ ।।

भंगतांना हृदयवीणा
घेतल्या तव प्रीत ताना
राग भैरवी गायिला ।। २ ।।

कु. यमुना गोडबोले
गायिका

जी. एन. जोशी
संगीत नियोजक

ये अणि ये राया

ये अणि ये राया भेटाया
वणवण फिरूनी शिणली काया ! ॥ धृ० ॥

दारी सुकला गुलाब सारा
वठली जाई जुई मोगरा
ये अणि ये राया फुलवाया... ॥ १ ॥

कुठवर पाहू, वाट साजणा
कुठवर साहू विरह यातना
जाईल का रे मम तप वाया... ॥ २ ॥

सरोजिनी रेगे
गायिका

व्ही. जी. भाटकर
संगीत

रुसली ग फुलराणी

रुसली ग फुलराणी
 गा भृंगा मधु गाणी ॥ धृ० ॥

वायूने जरि हिला डुलविले
रवि किरणांनी जरा खुलविले
हासे ना तरी मानी ! ॥ १ ॥

रान पांखरे उडुनी भरारा
हिला घालिती विंझणवारा
उमलेना परि राणी ! ॥ २ ॥

दंग जाहली तुझ्याच ध्यानी
कुजबुज मधुपा चाले रानी
झुरते वेडयावाणी ॥ ३ ॥

□ □ □

राया भारीच उशीर

राया भारीच उशीर झाला
आता पोचायचं कधी घराला ! ॥ धृ० ॥

किती किर्रर गर्द ही झाडी
काट्या कुट्यांत फाटल साडी
कशी भिती न तुझ्या जीवाला ! ... १

नागमोडी ही पाऊलवाट
सख्या नेईल दरीत थेट
जरा झुकता तोल कडेला ! ... २

खांद्यावरी विसावून माथा
आले चढून डोंगर माथा
आता पोचव धरून कराला ! ... ३

सौ. कालिंदी केसकर
गायिका

ए. पी. नारायणगांवकर
संगीत

आला वसंत आला

आला वसंत आला
हसवित खुलवित ही वनमाला ।।
वनराईमधि गात कोकिळा
साथ करित हा निर्झर आला
जाईजुई मोगरा बहरला
सुखवित चराचराला ।। धृ० ।।

हासत नाचत या फुलवेली
आंबराई ही बघ मोहरली
ठाइं ठाइं नव सुमने फुलली
दावित वैभव लीला ।।

के. एच. वाकणकर
गायक

जी. एन. जोशी
संगीत नियोजक

तू ग मोहिनी

तू ग मोहिनी चंचल राणी, काय मनी तव बोल !
धांव घ्यावया पाहि जिवाचा आतुर हा चण्डोल ।। धृ० ।।

वेळि अवेळिं फुलते स्मितकळी
मानु केवि तुजसी मी भोळी
रीत तुझी जरि जगावेगळी
देऊ नको का मोल ?
नजरबंदिचे पुरेंत चाळे
आवर साजणि अपुले जाळे
नकोस वळवू इथे पाऊले
जाइल तुझा तोल ।।

कु. एच. बाकणकर
गायिका

जी. एन. जोशी
संगीत नियोजक

चल जाऊ प्रीतीच्या गांवा

चल जाऊ प्रीतीच्या गांवा
दमला श्रमला जीव फार अपुला
घेऊ सुखे विसावा !
गोड गोडशी मंजुळ गाणी
गाऊ आपण राजाराणी
उजळू प्रीतीच्या नांवा !
प्रीतीचे मग होऊन भाट
प्रणयाचे न घेऊ पाठ
भरला पेला कांठोकांठ
कशास आता पाहू वाट
लावू ओठ, सखया ओठ
आता ओठ
विसरून आपपर भावा !

ताराबाई गद्गकर
गायिका

जी. एन. जोशी
संगीत नियोजक

लावू केवि बोल

लावू केवि बोल मी तुज सजणा
वदला न कधी तू बोल उणा ॥ धृ० ॥

येता अवचित तुझिया दारी
गोड कानी ये तव ललकारी
ओसंडित मग प्रीत खुणा ! ... १

एकांती तव येता जवळी
जुळे करांची सहज साखळी
द्यायचा दोष हा कुणी कुणा ! ... २

कु. सुमती त्रिलोकेकर
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

फुलवाया मन राया

फुलवाया मन राया या या भेटाया
मांडिलास छळ वाया सांग कासया ! ॥ धृ० ॥

जाईजुई मोगराही दारी बहरला
उमलशील परी तू कधी प्रीतिच्यां फुला
तव राणी ही झुरूनी जाय ना राया ! ... १

घेउनिया पंचारती हाती मोहना
येईन कधी सामोरी, जाहले मना
लाविशी का उशीर सांग यावया ! ... २

सरोजिनी वझे
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

तुज सांगू सखे

तुज सांगू सखे, तुज सांगू सखे
सखे ग केवि प्रीतिच्या खुणा !
जा विचार अपुल्या मना ! ॥ धृ० ॥

का हूरहूर दाटे गोड गोड हृदयात
उमटते कुठे ग नाद मधुर संगीत
छेडिता अंतरी वीणा ! ... ॥ १ ॥

का छटा गुलाबी पसरे गालावरती
का सांग न्याहळी कुणी नवयुवती
उमलता मुग्ध भावना... ॥ २ ॥

सरोजिनी वझे
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

बघ फुलल्या मधुपा

बघ फुलल्या मधुपा नव कलिका
का गुन्जारव तव होई मुका ! ॥ धृ० ॥

गुण गुण गुंजन सुमनाभवती
भ्रमशी रमशी ही तव रीती
अवगत मजला नाही का ! ... ॥ १ ॥

झुरत कमलिनी किती सरोवरीं
तूच तयाचा प्रीत पुजारी
होशील प्रेमा पारखा ! ... ॥ २ ॥

जा हसवाया उडुनि भरारा
रुसल्या फुगल्या कळ्या मधुकरा
तूच तयांचा प्राणसखा ! ... ॥ ३ ॥

दत्ता केळकर
गायक

व्ही. जी. भाटकर
संगीत

तव बोल खोल गेला

तव बोल खोल गेला
छेडीत अंतराला ! ॥ धृ० ॥

एकाच मंदिरात
राहून कैक रात
गाया असा अबोला
कैसा रुचे तुम्हाला ! १

राहू नकोस दूर
होऊ नको कठोर
लावू नकोस भाला
या भाबड्या जिवाला ! ... २

आता कशास वेळ
झाला न काय खेळ
अर्धा करार झाला
ने आज पूर्णतेला ! ... ३

ए. पी. नारायणगांवकर
गायक व संगीत नियोजक

तू हुषार जादूगार

तू हुषार जादुगार
आतूर मी बाला
तुझ्या दर्शनाला ॥ धृ० ॥

टाकिलेस मोहजाल
मजवरती तू खुशाल
आणि जाहलास दूर
अचुक याच वेळां ॥ १ ॥

भारिलेस मजला तू
आकळे न तव हेतू
ये लौकर मज सावर
जिंकील्या जिवाला ॥ २ ॥

वत्सला केळकर
गायक

जी. एन. जोशी
संगीत

साजणी सोड तुझा करपाश

साजणी, सोड तुझा करपाश
कर्तव्याची पहाट झाली
नुरला लव अवकाश ॥ धृ० ॥

गोड गोड तव साखर बोली ।
हृदय नकळत प्रीत पेरिली ।
त्या प्रीतीने भरले सारे ।
अंतरीचे आकाश ॥ १ ॥

प्रीत तुझी तर गोड आंधळी ।
फुलवित गोंडस गुलाब गाली ।
याहून दुसरा स्वर्ग कोणता
का भलता अभिलाष ॥ २ ॥

ए. पी. नारायणगांव
गायक व संगीत नियोज

लगबग चल सदना

लगबग चल सदना मोहना
निजले तरुवर निजली राने
आली नीज फुलांना ! ॥ धृ० ॥

भणभण वाहे वादळ वारा
चमके ना नभीं एकहि तारा
हुरहुर जाळी मना ! ... १

रुतले कितीतरी पायी कांटे
भीतीचे मनि काहुर दाटे
दिसती ना मार्गी खुणा ! ... २

कु. सुमती त्रिलोकेकर
गायिका

जी. एन. जोशी
संगीत नियोजक

दूर दूर जाऊ नको

दूर दूर जाऊ नको रानपांखरा
प्रीतीचा सोडून मम गोड आसरा ! ॥ धृ० ॥

निबिड घोर कांतारी
विहरशील वेड्यापरि
अनुतापे फिरशील परि याच तूं घरा ॥ १ ॥

चंचल तव मानसात
बण्डखोरी जन्मजात
म्हणून होय काय मदिय विफल ही गिरा ॥ २ ॥

जा खुशाल विहर स्वैर
पडू न देई मात्र विसर
हृदयाचा सतत खुला येथ पिंजरा ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

अवखळ भारिच ग

अवखळ भारिच ग कान्हा
शिणले धाउन मागुन बाई हाती लागेना ! ॥ धृ ॥

सांडुनि सारे दहिदूध लोणी
पळे द्वाड हा घट फोडोनी
ताल ना याच्या लीलांना ! ... ॥ १ ॥

लोभ हरीवर कां तव इतुका
प्रीत आंधळी राधे म्हणू कां
गाशी उगाच गुणगाना... ॥ २॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

मानस लहरीवरी....

मानस लहरीवरी उफाळे वादळ हे घनघोर
काही सुचेना काही रुचेना रूसला चित्तचकोर ॥ धृ० ॥

शुभ्र रुपेरी चादर तनुवरि
घेऊन निजली रजनी हंसरी
रातकिड्यांचा किरकिर परि मम लावि जिवाला घोर ॥ १ ॥

जाइजुई चाफा शेवंती
फुलल्या जरि मम अवती भंवती
परिमल चेतवि परि विरहानल नाचेना मनमोर ॥ २ ॥

लाख दीप जरि चमकत गगनी
दिपवित अवती निज तेजानीं
अमवास्येच्या अंधारी मम कुठे बिजेची कोर ॥ ३ ॥

सौ. कालिंदी केसकर
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

बोलू नको कटू बोल

बोलू नको कटू बोल मुरारी
का रागावून हृदय विदारी ? ॥ धृ० ॥

उजळशील मम मानस मंदीर
आस अंतरी हीच निरंतर
आले तुझीया दारीं ॥ १ ॥

लबाड कपटी असशी काळा
आळ तुजवरी जरी हा आला
प्रीत तुजवरी भारी ॥ २ ॥

विसरू नको, मज आता क्षणभर
देऊ नको मज तिळभर अंतर
तू माझा गिरिधारी ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

अजून का ये ना

अजून का ये ना कृष्णसखा
मनि धरिला का भाव परका ! ॥ धृ० ॥

जिवास हुरहुर
मनांत काहुर
झुरते राधिका बालिका ! ॥ १ ॥

जिवा विसावा
तूच माधवा
कां मग रुसवा तव इतुका ॥ २ ॥

तुझी कन्हैया
राधा छाया
तिजवर माया नाहि का ! ॥ ३ ॥

व्ही. जी. भाटकर
संगीत नियोजक

चंद्र नटवि गगनाला

चंद्र नटवि गगनाला
गृहिणी जेवि सदनाला ॥ धृ० ॥

शशी तिमिर दूर करी
गृहिणी नैरास्य हरी
बघुनि युवति येइ भरति हृदय सागराला ॥ १ ॥

भूषण शशिस निज लांछन
रमणि वदनिं तीळ स्नान
दूषण तरि हो भूषण खचित जनमनाला ॥ २ ॥

शशिवाचुनि शून्य गगन
गृहिणीविण आणि सदन
संगम जरि उगमाचा स्वर्ग येत भूला ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
गायक व संगीत नियोजक

घट भरला

घट भरला घट भरला
उचलुनि द्या कुणी शिरि मजला ॥ धृ० ॥

येईल बाई कृष्ण सखा
अडविल धरूनी वाट फुका
दिनही झरझर हा सरला ! ॥ १ ॥

ऐक सखे ग मधु मुरली
भान हरी तनु मोहरली
कुंजवनी मधुरव घुमला ॥ २ ॥

यमुना तीरी वाजवि बांसरि
जाऊ सखे चल पाहूं श्रीहरी
मोहित नाद सखे सकला ॥ ३ ॥

द. पी. नारायणगांवकर
गायक व संगीत नियोजक

किती गोड जादूगिरी

किती गोड जादूगिरी
मज कन्हैय्या मोही जरी ॥ धृ० ॥

लावुन माया तूं मज राया
विरहि लोटिसी जीवा या
कटु तव ही प्रीत हरी ॥ १॥

वाहिन राया ही मम काया
सुखवि, येई भेटाया
विनंती राधा करी ॥ २ ॥

□ □ □

प्रीति मम अनिवार

प्रीति मम अनिवार ! तुझ्यावर प्रीती मम अनिवार ।
तार छेडिता, तव नामाचा... उठे गोड झंकार ॥ धृ० ॥

पुनव रातिचे शुभ्र चांदणे
सख्या वाटते उदास वाणे
तुझ्याविना रे सुना साजणा जीवन अन् संसार ॥ १ ॥

तूच लाविली जिवास झुरणी
कां इतराजी मग वरकरणी
मी तव राणी वेड्यावाणी झुरते रे सुकुमार ॥ २ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत

तुझी राधा आली दारी

तुझी राधा आली दारी
म्हणि उघड दार ना गिरिधारी ! ॥ धृ० ॥

प्रीति सुधेचा घेऊन पेला
आता तुजला भेटायाला
सोड गोड हा राग मुरारी ! ... १

फिरवून जाता पाठ राधिका
जाईल हरी तव रुसवा लटका
येशील धांवत तू माघारी ! ... २

मास्टर चंदावरकर
गायक

जी. एन. जोशी
संगीत

छळु नको कन्हैया वाया

छळु नको कन्हैया वाया
राया येउं दे दया ! ॥ धृ० ॥
भरू दे घागर आता भरभर
पाणी ना घरी प्याया
सोड पदर तर कान्हा लवकर
नुरली का रे माया ! ... १

सुटता चटकन
घट हातातून
भिजेल ना मम काया ! ... २

जाऊं दे क्षणि आता सदना
भिवविती संध्याछाया ! ... ३

कु. सुधा जयवंत
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

कां इतका रुसवा

कां इतका रुसवा माधवा
भोळी राधा कळे न कावा
कोण तुझ्याविण जिवा विसावा ॥ धृ० ॥

आम्रतरूवर कोकिळ गाई
दरवळली बघ ही आमराई
आकळे न का जीव झुरावा ! ॥ १ ॥

तुझ्या संगती कोंडाभाकर
लागे देवा गोड खरोखर
कुठवर महिमा मी तव गावा ॥ २ ॥

फुले चांदणे अवनीवरती
लुकलुक तारा गगनीं करिती

□ □ □

ये ये प्रियतम राया

ये ये प्रियतम राया माझाच तू चकोर
झुरते इथे चकोरी लागे तुझाच घोर ! ॥ धृ० ॥

गेलास दो दिसाचा तू वायदा करून
चौमास आळवीते नेत्री आणून प्राण
आता किती स्मृतींचे निर्माल्य हुंगणार

लावून आग गेला जो एकदांच दूर
आता बुझविण्याचा नाहीच का विचार
आणिक कुठवर आता तू अंत पाहणार

कु. सुधा जयवंत
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

लाविशि वेड मला

लाविशि वेड मला यदुराया
दाउन लटकी माया ।। धृ० ।।

सदा कदा ती लाडिक मुरली
अधरी धरिशी तूं वनमाळी
हिणवाया मज वाया, राया ! ।। १ ।।

नको प्रीतिचा फोल पसारा
कळला मज तव कावा सारा
आवर फसवी छाया ! ।। २ ।।

मास्टर चंदावरकर
गायक

जी. एन. जोशी
संगीत

सुटला वादळ वारा

सुटला वादळ वारा
धुण्डित नौका पैलतिरा ! ॥ धृ० ॥

दूर किनारा
म्हणून किनारा
दाविसी की निज तोरा ॥ १ ॥

मेघ भयङ्कर
व्यापित अंबर
लपल्या भयभित तारा ॥ २ ॥

भेदून गगना
बिजली अंगना
फेंकित जणु अंधारा ॥ ३ ॥

प. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

ग्रामीण गीत

लय् वाढूळ झालाय
लय् वाढूळ झालाय् पोरी
बेगी बेगी बांध शिदोरी ! ॥ धृ० ॥

तू कवाची कणग्यामागं
व्हतीस हासत कोणासंगं
चार चौघांत बोलाय्ची चोरी ! ॥ १ ॥

पाटलाचा पोर लय द्वाड
मला ठावं काढी तुझी खोड
जरा जपून जपून रहा पोरी ! ॥ २ ॥

तुझ्या नावाचा गांवात बोभाटा
हाय अपलाच दाम परी खोटा
नको पदरांत घेऊ गुन्हेगारी ! ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

तुझी न माझी

तुझी नि माझी जमलीय जोडी
वल्हव बेगी बेगी होडी रे
राया होडी रे ! सख्या होडी रे ॥ धृ० ॥

डुलतेय नौका लाटासंग
उडतंय पाणी भिजतंय अंग
मार भराभर वल्ही पाण्यावर
तुझ्या हाताची मिठी आता सोडी रे ॥ १ ॥

बंदर राहीलं दूर कोसभर
गोड गोड अन् उरांत हुरहुर
नको रं म्होरं, फिर माघारं
थोडक्यामंदी राया गोडी रे ॥ २ ॥

आलंय झाकळून बघ वर अंबर
येईल उफाळून आता समिंदर
जाऊ झरझर पैल तिरावर
तुझ्या पिरतिची घाल गालजोडी रे ॥ ३ ॥

□ □ □

लाव नाखवा नाव

लाव नाखवा नाव किनारी ।। धृ० ।।
धडधडते मम उरात भारी ।

संगे घेऊन प्रेम पाखरू ।
सुटले बेछूट तव हे तारू ।
आदळेल रे कडे कपारी ।। १ ।।

असंख्य उडुनी तुषार तनुवर ।
भिजली काया राया बघ तर ।
वेग साजणा जरा आवरी ।। २ ।।

स्वैर नाचती ह्या लाटासरी ।
क्षणि पाताळी क्षणांत अंबरी ।
भरे कापरे फिर माघारी ।। ३ ।।

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

नाखवा वल्हव माघारि

नाखवा वल्हव–वल्हव–वल्हव माघारि नाव
वादळ उठलंय दर्यामंदी घेईल तळाला ठाव ॥ धृ० ॥

दूर सोडून गाव
ठेवून तुझ्यावर भाव
आले मी राया मासे धराया ठेवू कुणाला नाव

भरून आलं आभाळ
भासे समिंदर काळ
झुकेल तारू कसं निवारू पडेल काळाचा घाव ! ॥ १ ॥

बंदर राहिलंय् दूर
उठे मनी काहूर
नाव डोले घेई झोले
प्राण व्याकुळले
तव ही मानी
रुसेल राणी
नाव किनारी लाव !

सरोजिनी रेगे
गायिका

ए. पी. नारायणगांवकर
संगीत

वल्हव नाव दरियांत

वल्हव नाव दरियांत राजसा
चान्द डोईवर आला
पुनवरात ही खुलवित अवनी
लावित वेड जीवाला ! ... १

शितल चान्दणं अथांग सागर
डुले आपुली नौका त्यावर
नाचत नाचत राया जाऊं दे
गुंफीत तुषार माला ! ... २

फुटलं तांबडं आता राया
येतिल गावकरी शोधाया
होईल उघड गुपित राजसा
तुटेल अवचित माला ! ... ३

सौ. लीला सरदेसाई
गायिका

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

दर्यागीत

लाव नाव परतीराला

लाव नाव परतीराला उशिर झाला
एक एक लोपुन तारा अरुण काल आला ॥ धृ० ।

लुटली आपण रातरुपेरी
दरियामाजी या चन्देरी
दूर दूर येऊन येथे मधुर मीलनाला ॥ १ ॥

आवर कर तव आता सजणा
जाऊं दे मज लगबग सदना
गोड ओढ परि प्रीतीची लागली जिवाला ॥ २ ॥

ताराबाई गद्गकर
गायिका

जी. एन. जोशी
संगीत

आलं माझ्या रायाचं

आलं माझ्या रायाचं गलबत ग
आलं माझ्या धन्याचं गलबत ग
नाचत डुलत ग .. ॥ धृ० ॥

हिरवं हिरवं कापित पाणी
ये रायाची 'दरिया राणी'
झुकत झुकत गं... ॥ १ ॥

खळखळ करीत
लाटाशी खलबत
डौलत डुलत गं... ॥ २ ॥

निखळ पांढरं बगळ्यावाणी
फडफड हाले शिड वाऱ्यानी
रायाच्या नावेचं गं... ॥ ३ ॥

बोलक्या डोळ्यात
वळखिल गुपित
येइल धावत गं... ॥ ४ ॥

सौ. स्नेहलता मराठे
गायिका

जी. एन. जोशी
संगीत नियोजक

लावणी :

आण गळ्याची तुझ्या

आण गळ्याची तुझ्या
मनावर मन माझे सुंदरा
तुला पाहाता सुचे न धंदा
जीव होई बावरा ! ... ॥ १ ॥

वाटेला कुठवर मी लावू सख्या डोळे
विरहाने सतत गडे हृदय मात्र पोळे
हेतु मनातील कधी साजणा
करशील येऊन पुरा ! ... ॥ २ ॥

लावुनिया वेड मला तेढ अता केवि फुका
हृदयाशी धरून सख्या माफ करी लाख चुका
येशिल माझ्या घरी
करीन दिन सणापरी साजरा ! ... ॥ ३ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

सोड मनातील अढी

सोड मनातील अढी
साजणा ये लौकर मंदिरी !
लाखाची ही घडी फिरूनी कां येईल वरचे वरी ! ॥ धृ० ॥

विरहाने तनुतनुची होत काहली
हरिणीवाणी विकल होउनी पडले शय्येवरी ! ॥ १ ॥

एकदाच येउन मम पूर्ण मनोरथ करा
जोवरि मम घरधनी आले नाही घरा ॥ २ ॥

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

वसंत आला मळचांत

वसंत आला मळचांत माझ्या
कोकिळ घोळून गाई !
येई सुंदरा मजा लुटाया
पाहू तव चतुराई ! ॥ धृ० ॥

जपून टाकी हळूच पाऊल
हा प्रांत नवा तुज घे रे चाहुल
आहेत दारी परी ठाकले दोनच राखणदार
गोडी गुलाबी वांचून नाही खुले व्हायचे द्वार

कदंब आंबे अन् डाळिंबे
रसरसली बहराने लिंबे
लूट, दिला तुज मी परवाना, नकोच भलती घाई !

गुलाब चांफा बघ घमघमला
मोगरा नि केवडाहि फुलला
धुंद जाहला इथे कांसया, चाल पुढे लवलाही

बहार लुटला पुरा सुंदरा
का जाण्याची घाई ?
मोल टाकल्या वाचून राया येथून सुटका नाही
गडे जायचे नाही

व्ही. जी. भाटक
संगीत

चार मास लोटले

चार मास लोटले जाऊनी परदेशी सुंदरा
निघे न आता धीर साजणा कधी यायचे घरा ! ॥ धृ० ॥

स्वप्नांत सख्या दचकुन मी उठून पाहाते
लावुनिया दीप, शेज तुझी शोधिते
दोन दिसांचा बोल वायदा कधी व्हायचा पुरा ॥ १ ॥

भोंवतिचे प्रणयदङ्ग जीव पाहुनी
मदनशरें हृदय हाय जाय भंगुनी
विरहाकुल हा जीव सुंदरा होय पुरा बावरा ! ॥ २ ॥

एकान्ती करपाशी धरून साजणा
प्रणयरंग मजवरती उधळ मोहना
हेतू मनातील पुरा प्रियकरा येऊन आता करा ! ॥३॥

सरोज बोरकर
गायिका

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

अंगाई गीत :

नीज रे बाळा नीज

नीज रे बाळा नीज वेल्हाळा
शीण जीवाला भारीच झाला ! ... ॥ धृ० ॥

अखंड झोके तुला देऊन
कर हे माझे आले भरून
झोप ना लाडक्या उशीर झाला ! ... ॥ १ ॥

निजले तारे, विंझण वारे
तुझीच निद्रा कोणी नेली रे
निजला आता माझा छकुला ! ... ॥ २ ॥

□ □ □

बालगीत :

माझी गुणाची सोनुली

माझी गुणाची सोनुली
आहे कधीची झोपली ! ... ॥ धृ० ॥

काऊ चिऊ बागुलबुवा
भिती अशांची कोठली
भूर्भर धावे सारखी
मी सोडीताच मोकळी

बाई पुरे ग झोप ही
झाली उन्हे ही कोवळी
दारी पहा ही येऊनी
स्वारी कुणाची ठाकली !

ए. पी. नारायणगांवकर
संगीत नियोजक

किती नवलाची नवलाची

किती नवलाची नवलाची
बाग माझी ग बघ कशी गमतीची ! ॥ धृ० ॥

हिरवे हिरवे गार गालिचे
शाल पसरली मखमलिची
गुलाब चाफा शेवंती
घमघमल्या अवती भवती
मिजास हिची नवतीची ! ॥ १ ॥

पद :

लाविला जिवा कां जिव्हाळा

लाविला जिवा कां जिव्हाळा
दावून लाडिक चाळा
पसरून सारा
प्रणय पसारा
जीव साजणी लोभविला !
जीवन तारा
घन अंधारा
नेइल कां (गे) विलयाला !

पद :

नकोस दावूं बोलून

नकोस दावूं बोलून माई ?
खूण गाठ मनि पटली
कोण कोठली पुसे नाव तव
ओळख ही कुठली !

□ □ □

पद :

आज जीवन कलिका

आज जीवन कलिका मम फुलवी
विकसली हांसली डुलली ग !
येई न कसा मम प्राण सखा
चालला वेळ ना गडे फुका
झुरते ही राणी इथें खुळी !

□ □ □

पद :

अधरि धरि बासरी

अधरी धरि बासरी । मुरारी
गोड मधुरसी दे ललकारी ।।
गगनि चांद हा हांसत आला
नटली दुनिया नव रंगाला
सोड मौन रे तू गिरिधारी ।। १ ।।

कृष्णा उद्यावरकर
गायिका



कै. द. वि. गुप्ते

कै. गुप्ते हे मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत एका जबाबदारीच्या खात्यांत (Legal Dept.) काम करीत व केवळ हौसेखातर काव्य करण्याची त्यांना फार फार आवड. सात्विक, साधा, निरपेक्ष व विनम्र स्वभावामुळे त्यांच्या लिखाणांतही या स्वभावगुणांचे दर्शन झाल्यास नवल नाही. साधारण १९४० ते १९४७-४८ पर्यंतच्या काळांत मजकडे ध्वनिमुद्रणासाठी आलेल्या अनेक होतकरू कलाकारांसाठी द. वि. नी मला फारच बहुमोल मदत उत्तमोत्तम काव्यरचना देऊन केली.

* *